नियमित फौ. ख. क्र. ४/२०२०
सरकार -वि.- रेहमत
नि.क्र. १५.

सरकार तर्फे साक्षीदार क्र.२ यांची जबानी

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नाव - विनोद पंढरी भोयर,
वय ४१ वर्षे, व्यवसाय – पो.ना. ब.क्र. २१५७
राहणार - पोलीस स्टेशन उमरेड ता. उमरेड, जि. नागपूर.

**सरतपासणी-सहायक सरकारी अभियोक्ता श्री एस.एस.मोरे यांचे मार्फत**

१. मी आरोपीला ओळखतो. तो आज न्यायालयात हजर आहे. दिनांक २५.१०.२०१९ रोजी मी पोलीस स्टेशन भिवापूर येथे पो.शि. म्हणून कार्यरत होतो. त्यादिवशी पो.शि. श्रीचंद पवार यांनी माहिती दिली की, एक जनावरांनी भरुन येणारा ट्रक येणार आहे आपल्याला नाकाबंदी करिता जायचे आहे असे सांगितले. त्यानुसार मी, पो.शि. श्रीचंद पवार, पो.शि. अजय झाडे आम्ही पारवे पेट्रोल पंपाजवळ नाकाबंदी केली. त्यानंतर काही वेळाने सकाळी ६.४५ वाजताच्या दरम्यार एक ट्रक येताना दिसला. त्याला थांबवून त्याची विचारपूस केली असता त्यामध्ये गायी व गोऱ्यांसह एकूण ३२ जनावर मिळून आली. त्यानंतर श्रीचंद पवार यांनी पंचांना समन्स दिला व पंचांसमक्ष घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा तयार केला. त्यानंतर श्रीचंद पवार यांनी पोलीस स्टेशनला येऊन फिर्याद दिली. पोलीसांनी माझे बयान घेतले होते.

**सरतपास संपला.**

**उलट तपास आरोपी तर्फे त्यांचे वकील श्री नागोसे यांचे मार्फत**

२. हे म्हणणे खरे नाही की, मी तथाकथीत घटनेच्या दिवशी पेट्रोलींग करीत नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलीसांसह पारवे पेट्रोल

पंपाजवळ नाकाबंदी लावली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या समक्ष कुठलाही ट्रक जप्त करण्यात आला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास संपला.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत,
माझे समक्ष,

दिनांक ०८.०५.२०२५

स्वा/-
(एस. जे. लाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
भिवापूर.